# प्रेसनोट

दिनांक—२३/०७/२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नांव | ॲन्टी करप्शन ब्युरो अकोला घटक |
| २ | आरोपीचे नांव, हुद्दा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | १) आरोपी लोकसेवक श्री. विनोद बापुराव आढे, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), तलाठी कार्यालय, हिवरखेड ता. तेल्हारा जि. अकोला<br>२) प्रमोद गुलाबराव इंगळे, ऑपरेटर, ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), तलाठी कार्यालय, हिवरखेड ता. तेल्हारा जि. अकोला (खाजगी इसम) |
| ३ | सापळा तारीख | दिनांक २३/०७/२०२५ |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | १५,०००/— |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | १०,०००/— |
| ६ | घटनास्थळ | तलाठी मंडळ कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती, हिवरखेड ता. तेल्हारा जि.अकोला |

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील तक्रारदार यांनी दिनांक ०३/०७/२०२५ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय अकोला येथे तक्रार दिली की, त्यांच्या नावे असलेल्या मौजा हिवरखेड येथील प्लॉटची ऑनलाईन मध्ये नोंद करण्यासाठी ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) श्री. विनोद बापुराव आढे आणि त्यांचा ऑपरेटर प्रमोद गुलाबराव इंगळे हे १५,०००/— रूपये लाच रकमेची मागणी करीत आहेत.

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०४/०७/२०२५ रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी कार्यवाही आजमाविली असता, आरोपी क्र. १ विनोद आढे यांनी तडजोडी अंति १०,०००/— रूपये लाच रकमेची मागणी केल्याचे तसेच आरोपी क्र.२ प्रमोद इंगळे यांनी तक्रारदारला ग्राम महसुल अधिकारी विनोद आढे यांनी मागणी केलेल्या लाच रकमेस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले.

दिनांक २३/०७/२०२५ रोजी पंचासमक्ष सापळा कार्यवाही दरम्यान ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) यांनी आरोपी क्र. २ प्रमोद गुलाबराव इंगळे यांच्या मार्फतीने १०,०००/— रूपये लाच रक्कम स्विकारल्याने दोन्ही आरोपीस ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन हिवरखेड, ता. तेल्हारा जि. अकोला येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८च्या विविध कलमन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. मारुती जगताप, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र अमरावती, श्री. सचिंद्र शिंदे अपर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र अमरावती, श्री. मिलींदकुमार अ. बहाकर, पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अकोला यांचे मार्गदर्शनाखाली श्री. प्रविण वेरूळकर पोलीस निरीक्षक, श्री. अतुल इंगोले पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार श्रीकृष्ण पळसपगार, डिगांबर जाधव, अभय बावस्कर, संदीप ताले, प्रदिप गावंडे आणि चालक पो. अंम. नफीज शेख यांनी केली आहे.

तरी सर्व नागरीकांना आव्हान करण्यात येते कि कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा.

ऑफिस फोन नं. ०७२४—२४१५३७०
टोल फ्रि क्रं. १०६४
ईमेल—dyspacbakl@gmail.com

(प्रविण वेरूळकर)
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, अकोला